MHSO200024352017

दाखल तारीख २०/११/२०१७
नोंदणी तारीख २०/११/२०१७
निकाल तारीख १३/०५/२०२६
कालावधी व. म. दि.
०८ ०५ २३

**पार्ट 'अ'**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सांगोला, जि. सोलापूर यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारीः– श्रीमती पी. आर. कुलकर्णी )**

दि. १३ मे २०२६

नियमीत फौजदारी खटला क्र. ३०३/२०१७ निशाणी क्र. १०४

सांगोला पोलीस ठाणे गु. र. क्र. २६०/२०१५

**अभियोग पक्ष** : महाराष्ट्र सरकार तर्फे
सांगोला पोलीस ठाणे,
ता. सांगोला, जि. सोलापूर.

**अभियोग पक्षातर्फे** : सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. बी. नलवडे

**विरुध्द**

**आरोपी** : १. ज्ञानेश्वर दत्तात्रय इमडे,
वयः २६ वर्षे, धंदाः शेती,
२. कपील वसंत पाटील,
वयः २२ वर्षे, धंदाः शेती,
३. शंभू बाळासो इमडे,
वयः २४ वर्षे, धंदाः शेती,
४. दुर्योधन सूखदेव इमडे,
वयः ४५ वर्षे, धंदाः शेती,
५. नारायण सूखदेव इमडे,
वयः ४२ वर्षे, धंदाः शेती,
६. बंडू सुखदेव इमडे,
वयः ४० वर्षे, धंदाः शेती,
७. सुनिल बाळासो इमडे,
वयः २२ वर्षे, धंदाः शेती,
८. कावदेव उर्फ कामू महादेव इमडे,
वयः २९ वर्षे, धंदाः शेती,
सर्व रा.– सावे, ता. सांगोला, जि. सोलापूर.

**आरोपी तर्फे** : ॲड. श्री. एस. एल. देशमुख

## पार्ट 'ब'

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | २२/१०/२०१५ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | २३/१०/२०१५ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २०/११/२०१७ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २४/०४/२०२६ |
| न्यायनिर्णय आरक्षीत केल्याची तारीख | ०६/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय तारीख | १३/०५/२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सुटल्याचा दिनांक | दोषारोप ठेवल्याचे कलम | आरोपी निर्दोष की दोषी ? | शिक्षेचा तपशील | शिक्षेत सुट. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ज्ञानेश्वर दत्तात्रय इमडे | २६/१०/१५ | २६/१०/१५ | भा.द.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४९ प्रमाणे | निर्दोष | निरंक | निरंक |
| २. | कपील वसंत पाटील | २६/१०/१५ | २६/१०/१५ | --" -- | निर्दोष | निरंक | निरंक |
| ३. | शंभू बाळासो इमडे | २६/१०/१५ | २६/१०/१५ | --" -- | निर्दोष | निरंक | निरंक |
| ४. | दुर्योधन सूखदेव इमडे | २६/१०/१५ | २६/१०/१५ | --" -- | निर्दोष | निरंक | निरंक |
| ५. | नारायण सूखदेव इमडे | २६/१०/१५ | २६/१०/१५ | --" -- | निर्दोष | निरंक | निरंक |
| ६. | बंडू सूखदेव इमडे | २६/१०/१५ | २६/१०/१५ | --" -- | निर्दोष | निरंक | निरंक |
| ७. | सुनिल बाळासो इमडे | २६/१०/१५ | २६/१०/१५ | --" -- | निर्दोष | निरंक | निरंक |
| ८. | कावदेव उर्फ कामू महादेव इमडे | २६/१०/१५ | २६/१०/१५ | --" -- | निर्दोष | निरंक | निरंक |

## पार्ट 'क'
## अभियोग पक्षाचे साक्षादारांची यादी

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | सागर धोंडीबा शेळके | फिर्यादी, नि.७९ |
| २. | अंकूश दादा माने | नि.८० |

आरोपीतर्फे पुरावा देण्यात आला नाही. न्यायालयीन साक्षीदारांकडून पुढील पुरावा नाही.

## अभियोग पक्षातर्फे/बचाव पक्षातर्फे/न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी.

### अ. अभियोग पक्ष –

| अ. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ब. बचाव पक्ष–**

| अ. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क. न्यायालयातर्फे.**

| अ. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल | तपशील |
|---|---|---|
| १. | एम. आर. १४२/२०१५ | १. एक ओबड धोबड आकाराचा एका हातात मावेल एवढा<br>२. एक ओबड धोबड आकाराचा एका हातात मावेल एवढा |

---

**न्यायनिर्णय**

( अधिघोषणा दिनांक १३/०५/२०२६ )

प्रस्तुत प्रकरण आरोपी क्र.१ ते ८ यांचे विरुध्द विरुध्द भारतीय दंड विधान, १८६० (यापुढे संक्षेपाकरिता 'भा.दं.वि.' असा उल्लेख करण्यात येईल) चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७ सह कलम १४९ प्रमाणे दोषारोप सिध्दतेकरिता चालविण्यात आला.

२. अभियोग पक्षाचे प्रकरण थोडक्यात असे की, फिर्यादी सागर धोंडीबा शेळके, रा. सावे, ता. सांगोला, जि. सोलापूर हे दि.२२/१०/२०१५ रोजी रात्री ९.०० वाजणेच्या सुमारास गावडे चौकात उमेश गावडे याचे दुकानासमोर रोडवर, सावे, ता. सांगोल, जि. सोलापूर येथे त्याचे मित्रांसह चौकात उभा असताना ज्ञानेश्वर इमडे, कपिल पाटील, शंभू इमडे, कामू इमडे, दुर्योधन इमडे, नारायण इमडे, बंडू, इमडे, सुनिल इमडे, सातपुते अशा सर्वांनी मोटारसायकलवरुन येवून फिर्यादी यांच्या दिशेने पळत येवून ज्ञानेश्वर इमडे याने "दोन वर्षापूर्वी ग्रामपंचायत निवडणूकती आमचे विरोधात काम केलेस काय" असे म्हणाला. त्यातील इतर लोकांनी पाठीवर व डोक्यात जमिनीवर पडलेले दगड हातात घेवून फिर्यादीस मारहाण केले. तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केले. अंकुश माने

याला ज्ञानेश्वर इमडे याने "तु मला फोन करुन चौकात बोलावतोस काय" असे म्हणून सर्वांनी दगडाने व लाथाबुकयांनी मारहाण केले. म्हणून फिर्यादीने आरोपींविरुध्द फिर्याद दाखल केले.

३. प्रस्तुत फिर्यादवरुन आरोपींविरुध्द गु.र.क्र.२६०/२०१५ अन्वये भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७ सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास स.पो.नि. ए. एस. कादबाने, सांगोला पोलिस स्टेशन यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान तपास अधिकारी यांनी घटनास्थळ पंचनामा केला, गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त केले, वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले, आरोपींना अटक केली आणि साक्षीदारांचे जबाब नोंदवून तपासाअंती न्यायालयात दोषारोप पत्र सादर केले.

४. आरोपी न्यायालयात हजर झाले. माझे पूर्वाधिका–यांनी आरोपींचे विरुध्द दोषारोप निश्चित करुन त्यातील मजकूर आरोपींना वाचून व समजावून सांगण्यात आले असता त्यांनी गुन्हा नाकबूल करुन संपरिक्षा चालविण्याची विनंती केली. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ अन्वये जबाब नोंदवण्यात आले नाही.

५. उभय पक्षांचे युक्तिवाद ऐकले. अभिलेखाची सखोल शहानिशा केली. न्यायनिर्णयासाठी उद्भवलेले मुद्दे त्यावरील निष्कर्ष व कारणमीमांसा खालीलप्रमाणे देत आहेः–

| <u>अ.क्र.</u> | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्ष सिध्द करतो का की, आरोपी क्र.१ ते ८ यांनी गैरकायद्याची मंडळी जमवून जमावाच्या उद्दीष्टपूर्तीसाठी दि.२२/१०/२०१५ रोजी रात्री ९.०० वाजण्याचे सुमारास मौजे सावे, ता. सांगोला येथील गावडे चौकातील उमेश गावडे याचे दुकानासमोर रोडवर फिर्यादी व साक्षीदार यांना | नकारार्थी |

| | |
|---|---|
| प्राणघातक हत्यार दगडाने मारहाण करुन दुखापत केली तसेच प्राणघातक हत्यार दगड फिर्यादीच्या डोकीत मारुन त्यास इच्छापूर्वक दुखापत केले ? | |
| २) अभियोग पक्ष हे सिध्द करतो का की, वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी गैरजमावाची मंडळी जमवून जमावाच्या उद्दीष्टपूर्तीकरीता फिर्यादी व साक्षीदार यांना लाथाबुक्यांनी मारहाण करुन स्वेच्छा पुर्वक दुखापत केली? | नकारार्थी |
| ३) अभियोग पक्ष हे सिध्द करतो का की, वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी गैरजमावाची मंडळी जमवून जमावाच्या उद्दीष्टपूर्तीकरीता फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळी करुन इच्छापुर्वक, उद्देशपुर्वक अपमान केला व त्यांना प्रक्षोभित केले आणि अशा प्रक्षोभनामुळे त्यांच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा त्या मागचा उद्देश होता? | नकारार्थी |
| ४) अभियोग पक्ष सिध्द करतो का की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून जमावाच्या उद्दीष्टपूर्तीसाठी फिर्यादी व साक्षीदारास दमदाटी करुन फौजदारी पात्र धाकदपटशा केला? | नकारार्थी |
| ५) अभियोग पक्ष सिध्द करतो का की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून जमावात उद्देशपूर्वक सामिल झाले? | नकारार्थी |
| ६) अभियोग पक्ष सिध्द करतो का की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून जमावाच्या उद्दीष्टपूर्तीसाठी बलप्रयोग किंवा हिंसाचार करुन दंगा केला? | नकारार्थी |
| ७) अभियोग पक्ष सिध्द करतो का की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे मुंबई | नकारार्थी |

पोलिस अधिनीयमाचे ३७(१)(३) खालील प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन केले, त्याप्रमाणे मुंबई पोलिस कायदा कलम १३५ अन्वये गुन्हा केला?

८) आदेश काय ? अंतिम आदेशाप्रमाणे

## <u>कारणमीमांसा</u>

**<u>मुद्दे क्र. १ ते ८ करिता</u> –**

६. उपरोक्त सर्व मुद्दे हे ऐकमेकांशी संबंधित असल्याने पुराव्याची पूनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीतपणे चर्चेकरिता घेतले आहेत.

७. आरोपींवरील आरोप सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र.१ फिर्यादी सागर धोंडीबा शेळके (नि.७९) यांनी त्यांचे जबाबात असे सांगितले की, आरोपी त्याचे गावचे असून तो आरोपीला ओळखतो. सन २०१२ मध्ये ग्रामपंचायत निवडणूक झालेली होती. त्यावेळी तो त्याचा मित्र ज्ञानेश्वर इमडे याच्या विरोधी गटात होता. दि.२२/१०/२०१५ रोजी ५.०० वाजता तो कोठे होता व काय घडले हे त्यास आठवत नाही. त्यांनी गैरसमजूतीतून फिर्याद दिली होती. फिर्यादीस फिर्याद व प्रथम खबर अहवाल दाखवले असता त्यावरील त्यांची सही ओळखून त्यातील मजकूर माहित नसल्याचे सांगितले.

८. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र.२ अंकुश दादा माने (नि.८०) यांनी त्यांचे साक्षीत अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. त्यांना फितूर घोषित करण्यात आले. फिर्यादी व साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसलेने भारतीय पुरावा कायद्यानुसार सरकारी वकीलांचा तोंडी विनंतीवरुन उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. फिर्यादीने त्याचे उलटतपासामध्ये असे सांगितले की, त्याचेत व आरोपींचेत न्यायालयाबाहेर तडजोड झाले आहे. त्याप्रमाणे फिर्यादी व आरोपींनी निशाणी क्र.८३ कडे तडजोड पुरसीस दाखल केले आहे. सदर पुरसीसचे अवलोकन करता

प्रस्तुतचे प्रकरण फिर्यादी व आरोपींचे दरम्यान न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे स्पष्ट होते. अभियोग पक्षाला आरोपींना गुन्हयामध्ये गोवण्याइतपत पुरावा अभिलेखावर आणता आलेला नाही. त्यामुळे आरोपींना दोषी धरण्या इतपत कोणताही सबळ पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही.

९. फिर्यादीने त्याचे उलटतपासात तडजोड पुरसिस प्रमाणे फिर्यादीची आरोपीसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे देखील मान्य केलेले आहे. त्यामुळे आरोपीचा गुन्हयातील सहभाग सिध्द होत नाही. त्यामुळे उपलब्ध असलेल्या साक्षी पुराव्यावरून भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७ सह कलम १४९ चे आवश्यक घटक सर्व शंकांच्या पलीकडे जाऊन सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. सबब, उपलब्ध असलेल्या पुराव्याआधारे तसेच उभय पक्षांमधील झालेली तडजोड या बाबींचा विचार करता आरोपीच्या विरोधात निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. तसेच एकमेकांत चांगले संबंध ठेवण्यासाठी तडजोड केल्याचे सुचित केल्यामुळे अभियोग पक्षाच्या साक्षीदारांनी अभियोग पक्षास समर्थन केले नाही म्हणून त्यांच्या विरुध्द कारवाई करणे उचित होणार नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दे क्र.१ ते ७ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहेत. उपरोक्त मुद्यांच्या निष्कर्षांवरून आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र.८ च्या उत्तरार्थ मी खालील आदेश पारीत करत आहे.

:: **<u>आदेश</u>** ::

१. आरोपी क्र.१ ज्ञानेश्वर दत्तात्रय इमडे, आरोपी क्र.२ कपील वसंत पाटील, आरोपी क्र.३ शंभू बाळासो इमडे, आरोपी क्र.४ दुर्योधन सूखदेव इमडे, आरोपी क्र.५ नारायण सूखदेव इमडे, आरोपी क्र.६ बंडू सूखदेव इमडे, आरोपी क्र.७ सुनिल बाळासो इमडे, आरोपी क्र.८ कावदेव उर्फ कामू महादेव इमडे यांना भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७ सहकलम १४९ अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपांमधून फौजदारी

प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत प्रकरणात आरोपींनी यापूर्वी दिलेला जामिन व जात मुचलका अपिल कालावधीपर्यंत कायम करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत प्रकरणातील मुद्देमाल एम. आर. १४२/२०१५ हे मुल्यहीन असल्याने अपिल कालावधी नंतर नष्ट करण्यात यावे.

(खटल्याचा निकाल खुल्या न्यायालयात देण्यात आला.)

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2026.05.13 12:54:48 +0530

सांगोला
दिनांक : १३/०५/२०२६

**( श्रीमती पी. आर. कुलकर्णी )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सांगोला.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Mrs. P. R. Kulkarni,<br>Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 13/05/2026 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 13/05/2026 |